# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १८३-२२ दिनांक :- १६/०६/२०२२

## एटीएम सेन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणुक करणा-या सराईत आरोपीतांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा-भाईदर, वसई-विरार परिसरात गेल्या काही महिण्यांपासुन एटीएम सेंन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करुन फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीतांचा शोध घेवुन पायबंद घालणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस पथक असे विविध गुन्हयांचा समांतर तपास करित असतांना पो.हवा/ सागर बारवकर यांना मिळालेल्या खात्रीशिर माहितीवरुन आरोपीत नामे १) दिपक ऊर्फ विक्रांत राधेशाम शुक्ला वय २० वर्षे, सद्या रा. वेस्टर्न पार्क बिल्डींग, यशवंत गौरव , नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर. मुळगाव ग्राम पुरे अजबी, पो.स्टे. बेलाडे शुक्ल, तहसील हरैया, जि. बस्ती, राज्य उत्तर प्रदेश. २) शिखर कुमार विजय मिश्रा वय - २१ वर्षे, सद्या रा. वेस्टर्न पार्क बिल्डींग, यशवंत गौरव , नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर. मुळगाव ग्राम - फरेंदा पो.स्टे महाराज गंज, तहसील हरैया, जि. बस्ती राज्य उत्तर प्रदेश यांना आज दिनांक १६/६/२०२२ रोजी धानीवबाग येथून ताब्यात घेवुन त्यांचे कडे चौकशी करता त्यांचे कब्जात विविध बॅकांची ३४ ए.टी.एम. कार्ड मिळुन आले. तसेच सदर गुन्हे करण्यासाठी वापरण्यात येणारी ॲक्टीवा स्कुटर मोटारसायकल ५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

नमुद आरोपीत यांचे कब्जात मिळुन आलेल्या ए.टी.एम कार्डची पडताळणी केली असता नमुद आरोपीत यांचा खालील गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | ५०८/२०२२ | भा.द.वी. कलम ४२० |
| २ | तुळींज पोलीस ठाणे | ३७१/२०२२ | भा.द.वी. कलम ४२० |

उपरोक्त आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता आरोपीत यांनी अशाच प्रकारे उत्तर प्रदेश येथील बस्ती, सुलतानपुर, गौंडा या जिल्हयात अनेक गुन्हे केल्याची माहिती मिळून आली आहे. तसेच ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीत नामे - दिपक ऊर्फ विक्रांत राधेशाम शुक्ला हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर उत्तर प्रदेश मधील सिध्दार्थनगर, बस्ती गौण्डा मधील विविध पोलीस ठाणे अंतर्गत हत्येचा प्रयत्न, गोळीबार करुन लुटमार करणे, बेकायदेशीर हत्यार बाळगणे, फसवणुक व चोरी करणे असे गंभीर स्वरुपाचे १२ गुन्हे दाखल आहेत.

नमुद दोन्ही आरोपीत यांना पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५०८/२०२२ भा.द.वी. कलम ४२० या गुन्हयात वर्ग करण्यात आलेले असुन त्यांचे कब्जात मिळुन आलेल्या विविध बॅकेचे ए.टी.एम. कार्ड बाबत अधिक तपास सुरु आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति कार्या. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मनोज चव्हाण, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा./सागर बारवकर, पो.अं/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.